# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ २५ /२०२३ | दि.१८/०२/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात व कोळसेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत श्री. तिर्थक्षेत्र पिंपळेश्वर महादेव मंदिर, डोंबिवली पूर्व येथे **'महाशिवरात्री'** निमित्त सालाबादप्रमाणे महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. गतवर्षीप्रमाणे यावर्षी दिनांक १८/०२/२०२३ रोजी **'महाशिवरात्री'** निमित्त यात्रा भरणार असून दुसऱ्या दिवशी दि. १९/०२/२०२३ रोजी महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. या दरम्यान ७० ते ८० हजार भाविक महादेव दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेत असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एमव्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण शिळ रोडने डोंबिवली पूर्व – पश्चिमकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना पिंपळेश्वर चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सोनारपाडा चौक रॉयल वाईन्स समोरून सर्व्हीस रोडने ए १ आर्क वेल्ड कंपनीचे रस्त्याने टेम्पो चौक साईबाबा सागाव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) डोंबिवली पूर्व – पश्चिम येथील कल्याण शिळ रोडने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना एम.आय.डी.सी. टेम्पो चौक येथे पिंपळेश्वर मंदिर बाजूस **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने एम.आय.डी.सी. टेम्पो चौक कडून सिमेंट कॉंक्रिट रोडने सोनारपाडा चौक रॉयल वाईन्स मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. १८/०२/२०२३ रोजी सकाळी ००:०१ ते १९/०२/२०२३ रोजी रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

CamScanner

- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
- नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
- ठाणे पोलीस पत्रक

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner